# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ३० जानेवारी २०२५


# बहुजननायक छत्रपती शिवाजी महाराज



महाराष्ट्र ही जशी संतांची भूमी आहे, तशीच ती विचारवंताची आणि महामानवांची देखील भूमी आहे. त्याच बरोबर विविध महान परंपरांनी आणि विचारांनी पवित्र झालेली ही पावनभूमी आहे. संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमित फुले-शाहू-आंबेडकर ही महान विचारांची परंपरा रुजलेली आहे. या परंपरेने महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण जगाला एका आदर्श समाजव्यवस्थेचा आणि सांस्कृतिक विचारांचा वारसा आणि वसा दिला आहे. या परंपरेच्या मुळाशी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची प्रेरणा असलेली दिसते. महाराष्ट्राच्या मातीत जन्म घेणाऱ्या प्रत्येकाला जात, धर्म, पंथ, वंश, प्रांत या पलीकडे जाऊन रयत या एकाच शब्दात शिवाजी महाराजांनी बांधून ठेवले. हे महान कार्य साडेतीनशे वर्षापूर्वी ज्या छत्रपती शिवाजी महाराजांनी केले त्या शिवरायांची किर्ती ही शब्दातही न बसणारी आहे. शब्दांच्या पलीकडे जाऊन बहुजननायक छत्रपती शिवाजी महाराज हे समजून घ्यावे लागतील.

'बहुजन नायक छत्रपती शिवाजी महाराज' या निबंधाची सुरुवात आफ्रिकेतील एका म्हणीपासून करतो ती म्हण अशी आहे की, "जोपर्यंत सिंहांना कथेकरी सिंहच भेटत नाही, तो पर्यंत शिकारीचा इतिहास नेहमीच शिकाऱ्यांचा गौरव करीत राहिल." या म्हणीप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांवर लाखो पुस्तके, चरित्रे लिहिले गेली परंतु या लाखो पुस्तकामध्ये बंदिस्त होईल याच्याही पलीकडे शिवाजी महाराज यांचे कार्य आणि कर्तृत्व आहे. या कर्तृत्वाला इतिहासकार सुध्दा योग्य प्रकारे न्याय देऊ शकले नाहीत. याचे कारण छत्रपती शिवाजी महाराज ही आसामीच अशी आहे की जी इतिहासकारच काय तर इतिहासाला न सुटलेलं कोडं म्हणजे शिवाजी महाराज आहेत. आज साडेतीनशे वर्षे झाली परंतु शिवाजी महाराज आग्र्याहून सुटून येताना कोणत्या मार्गाने आले याचे उत्तर अद्यापही इतिहासाला, इतिहासकाराला सापडलेलं नाही. अशा एक नव्हे तर अनेक गोष्टी आहेत, प्रसंग आहेत की ज्याचं उत्तर इतिहास देऊ शकत नाही. असं म्हटलं जातं की एक इतिहासकार इतिहास घडवू शकत नाही परंतु इतिहास बदलू शकतो. पण शिवाजी महाराजाचा इतिहास बदलू शकेल असा इतिहासकार अद्यापही जन्माला आला नाही. म्हणून ही म्हण सांगते की सिंहाचा इतिहास लिहायचा असेल तर सिंहच कथेकरी असला पाहिजे अन्यथा शिकाऱ्यांचाच गौरव केला जाईल.

छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि कार्य समजून घेण्यासाठी सर्वप्रथम मॉसाहेब जिजाऊ समजून घ्याव्या लागतील कारण भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार बाबासाहेब आंबेडकर असले त्यांच्या जीवनाचे आणि विचारांचे शिल्पकार छत्रपती शिवाजी महाराज आहेत हे विसरता कामा नये. याप्रमाणेच छत्रपती शिवाजी महाराज हिंदवी स्वराज्याचे शिल्पकार असले तरी त्यांच्या जीवनाच्या आणि विचारांच्या शिल्पकार राजमाता, राष्ट्रमाता माँ साहेब जिजाऊ आहेत. म्हणून ज्ञान, अभिमान, स्वाभीमान, त्याग, निष्ठा, पराक्रम, बाणेदारपणा, धाडस, शौर्य आणि अस्मिता या सर्व गोष्टींचे उगमस्थान असणारे छत्रपती शिवाजी महाराज जिजाऊच्या कुशीमध्ये असतानाच मॉसाहेब जिजाऊंनी हिंदवी स्वराज्याचा संकल्प केला होता. त्या संकल्पामागे तत्कालीन कारणेही तशीच होती. सगळीकडे हाहाकार माजला होता, शेतकऱ्यांच्या शेतीमालाची लुटालुट सुरु होती, स्त्रियांच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली जात होती, स्त्रियांना, शेतकऱ्याना छळले जात होते, मोघलांनी, डचांनी, पोर्तुगिजांनी, फ्रेंच लोकांनी धुमाकुळ घातला होता. हे सर्व जिजाऊ मॉसाहेब पाहत होत्या, सोसत होत्या, अनुभवत होत्या तेव्हापासून स्वराज्याची निर्मिती सुरु झाली. जिजाऊंना विश्वास होता माझ्या पोटी जन्माला येणारा बाळ हा फक्त अन्यायाला न्याय मिळवून देण्यासाठी, स्त्रियांचे रक्षण करण्यासाठी, शेतकऱ्यांचे कल्याण करण्यासाठी जन्माला येणार आहे. म्हणजे आपण सर्व तर आता शिवाजी महाराजांना बहुजननायक छत्रपती शिवाजी महाराज आहेत असं म्हणतो परंतु जिजाऊंनी आपल्या कुशीत असतानाच बहुजणांचा उध्दारकर्ता, बहुजणांचा राजा म्हणून शिवाजी महाराजांना घोषीत केले होते. हा विचार आणि संस्कार मॉसाहेब जिजाऊनी दिला. जिजाऊनी केलेल्या संस्काराची शिदोरीच एवढी होती की, ती शिवरायांना आयुष्यभर पुरुन उरली, आज बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळ्याचा सत्याग्रह केला हे सर्वांना ज्ञात आहे. परंतु शिवाजी महाराजानी रायगडाच्या पायथ्याशी पाचाडला राहत असताना त्यांच्या राहत्या ठिकाणी असणारी तकया नावाची विहिर सर्व दलित, बहुजण लोकांसाठी खुली होती ही गोष्टही तेवढीच महत्त्वाची आहे. या गोष्टीत बहुजणांचा नायक छत्रपती शिवाजी दडलेला आहे, हेही समजून घेणे गरजेचे आहे.

शहिस्तेखानाला पाऊण लाख सैन्याचा पहारा असताना सुध्दा शिवरायांनी शाहिस्तेखानाच्या महालात जाऊन शाहिस्तेखानाची बोटे छाटली या ठिकाणी एक विचार महत्त्वाचा आहे, शिवाजी महाराज शाहिस्तेखानाला पोटात सुरा खूपसून ठार ही करु शकत होते पण या ठिकाणी त्यांनी शिवनीती वापरली. शिवाजी राजाना त्यांच्या सर्व शत्रुना दाखवायचे होते की हा हिंदवी स्वराज्याचा राजा लाखो सैन्याचा पहारा असूनही कुठूनही, कसाही, केव्हाही आणि कधीही येऊन मारु शकतो. शाहिस्तेखानाला मारले असते तर तो एकटा मेला असता पण शिवाजी महाराजांना त्यांच्या इतरही शत्रुना मारायचे होते. ही त्यांची शिवनीती होती. या प्रसंगाच्या नंतर शिवरायाचं नुसतं नाव जरी काढलं तरी अनेकांना धाम फुटायचा कारण आग्नीच्या ज्वालेतून तयार झालेलं हे शिवबा नावाचं तलवारीच पातं होतं. याबरोबरच आणखी एक महत्वाची गोष्ट या प्रसंगात आहे. शाहिस्तेखानाची मुलगी या प्रसंगात हरवते तेव्हा शाहिस्तेखानाची बोटे छाटलेली असताना सुध्दा तो शिवरायांबद्दल गौरवोद्गार काढतो. शाहिस्तेखान म्हणतो, "शत्रुंच्याही स्त्रियांना मराठ्यांच्या देव्हाऱ्यावरची देवता मानणारा शिवाजी माझी मुलगी घेऊन जाऊच शकत नाही. आणि जर शिवाजींच्या सैन्यांनी माझी मुलगी नेली असेल तर माझी मुलगी माहेरी गेली आहे. जी हिंदवी स्वराज्यातून साडीचोळी घेऊन सन्मानाने परत येईल. शत्रुचाही एवढा विश्वास शिवाजी महाराजांवर होता. म्हणून संपूर्ण रयतच नव्हे शत्रुसुध्दा शिवाजी महाराजाना बहुजनांचा नायक छत्रपती शिवाजी म्हणून ओळखत होते.

आज जे जे लोक शिवाजी महाराजांच्या नावाचा जप करत राहिले ते-ते लोक बंगल्यावर बंगले, मजल्यावर मजले बांधत राहिले. आणि जे लोक शिवरायांना विसरुन टाळ कुटत राहिले ते टाळ घेण्यासाठीही महाग झाले. प्लेग साथीत उंदीर मरावे तसे आत्महत्या करुन पटापट मरु लागले. हे भारताचे दुर्दैव आहे. अरे अवघ्या जगावर अमेरिका राज्य करते, आपले अधिराज्य गाजवते पण त्या अमेरिकेचे क्युबासारख्या मुंबईएवढ्या छोट्या देशापुढे काहीच चालत याचे कारण क्यूबाचे राष्ट्राध्यक्ष सांगतात शिवाजी महाराजांची युध्दनीती आम्ही वापरतो. एवढेच नव्हे तर जर्मनीचा हुकुमशाह बादशाह हिटलर सुभाषचंद्र बोस यांना सांगतो "नेताजी तुमच्या देशाला स्वातंत्र्यासाठी कुठल्याही हिटलरची गरज नाही तर तुमच्या देशात जन्माला आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाची गरज आहे." हे ॲडाल्फ हिटरचे उदगार आहेत. त्याचबरोबर लॉर्ड मांऊटबॅटन म्हणतो, "जर शिवाजी महाराज इंग्लंडमध्ये जन्माला आले असते तर आम्ही पृथ्वीवरच काय परग्रहावरही राज्य केलं असतं." याही पुढे जाऊन सतराव्या शतकात युरोप खंडात 'लंडन गॅझेट' नावाचं आघाडीचं वृत्तपत्र होतं. जेव्हा शिवाजी महाराज आग्र्याहून सहिसलामत सुटून आले तेव्हा या वृत्तपत्राने पहिले पानावर जी बातमी छापली होती त्यात शिवाजी महाराजांचा "Shivaji The King of India" असा उल्लेख केला होता. ज्या राजाचा संबंध भारताचा राजा म्हणून उल्लेख होतो. त्या शिवरायांना बहुजननायक छत्रपती शिवाजी महाराज म्हणताना आपली मान सह्याद्रीपेक्षा उंच झाली तर नवल नाही. ज्या शिवरायाना अवघं जग डोक्यावर घेऊन नाचतं त्या शिवाजी महाराजांचे धोरणे भारतात मात्र अजूनही अवलंबविले जात नाही. अरे ज्या एकट्या शिवरायांनी शेकडो दुष्मनाला कंठस्नान घातले, बत्तीस फितुरांची मुंडकी उडवली, फ्रेंच, डच, पोर्तुगीज, मोगलाई, या सर्वांना पळता भुई करुन संपवले, पळवून लावले आणि जगाला आदर्श घालून दिला, ते कशाच्या जोरावर तर त्याचं उत्तर म्हणजे त्यांच्यासोबत असणारे बारा बलुतेदार आणि अठरा अलुतेदार या अठरापगड जातींच्या लोकाना सोबत घेऊन स्वराज्याचे रक्षण केले. बहिर्जी नाईक, तानाजी मालुसरे, प्रतापराव गुज्जर, दाउद इब्राईम, संताजी घोरपडे, हंबीरराव मोहिते, बाजीप्रभू देशपांडे, हिरोजी फर्जंद, शिवा काशीद ही काही नमुन्यादाखल नावे घेतली तरी स्वराज्याचे सेवक हे अठरापगड जातीचे होते हे लक्षात येते, एवढेच नव्हे छत्रपतींच्या स्वराज्यात एखादी जबाबदारी देताना जाती-पातीच्या नात्यागोत्याच्या जोरावर दिली जात नव्हती तर तलवारीच्या पातीवर आणि मनगटाच्या जोरावर जबाबदारी दिली जात होती यामुळे शिवाजी महाराज हे खऱ्या अर्थाने बहुजन नायक होते असे अभिमानाने सांगावे लागते.

इतिहासामध्ये वारंवार सांगितलं जातं की शिवाजी महाराजांनी अफझल खानाचा कोथळा बाहेर काढला, अफझल खानाचा वध केला. परंतु अफझल खानाचा वध केल्यानंतर अफझल खान आमचा शत्रु होता तो फक्त मेरपर्यंत आता तो आमचा शत्रु नाही. त्यामुळे त्याच्या स्मरणार्थ एक मश्जिद बांधा आणि त्यात लागणाऱ्या दिवा बत्तीची सोय करा असे सांगणारा राजा किंवा शेतामध्ये कुराणाची प्रत सापडल्यावर ती आपल्या सैन्यातील बांधवापर्यंत देऊन त्या कुराणाचा योग्य सन्मान करणारा शिवाजी हा जिजाऊंचा पुत्र बहुजन प्रतिपालक राजा म्हणून आदर्श होता. त्यामुळेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात विश्वासघात आणि फितुरी हे नाणी नसून राजनिष्ठा आणि इमान ही दोन नाणी चलनात होती. शिवाजी महाराजांप्रती इमान किती असावं याचंही इतिहासात एक उदाहरण आहे. ते म्हणजे शिवाजी महाराजांचा ज्यावेळी मृत्यू झाला आणि चिता पेटली त्यावेळी त्यांच्या लाडक्या कुत्र्यानं (वाघ्यानं) पेटत्या ज्वालेत वाघासारखी झेप घेऊन आपलं इमान छत्रपती शिवाजी महाराजांच्या चितेवर ठेवलं. सह्याद्रींच्या काळ्यामातीवर शिवाजी महाराजांची ही माया पाहून केवळ मावळेच नाही तर एक प्राणी सुध्दा आपला जीव ओवाळून टाकतो. हे जगाच्या इतिहासातले पहिलेच उदाहरण असेल. म्हणून छत्रपती शिवाजी महाराज हे फक्त राजे नव्हते तर मुक्या प्राण्यावर आणि हाडामासाच्या गोळ्यांवर प्रेम करणारे बहुजननायक छत्रपती शिवाजी महाराज होते. हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

एकूनच शेतकऱ्यांच्या मिरचिच्या देठालाही हात लावू नका असे सांगून शेतकऱ्यांचे हित जोपासणारा शेतकऱ्यांचा राजा, शत्रुच्याही स्त्रियांना आपल्या देव्हाऱ्यावरची देवता मानून तिची साडी चोळी देऊन सन्मानाने पाठवणारी करणारा, प्रसंगी स्त्रियांवर अत्याचार करणाऱ्याची बोटे छाटायला आपला सखा मामा धनाजी यापासून सुरवात करणारा स्त्रीरक्षणकर्ता, शत्रू मेल्यानंतर त्याची कबर बांधणारा आणि दिवा बत्तीची सोय करणारा सन्मानकर्ता, हुकूमशाहीला खडे चारुन लोकशाही प्रस्थापित करणारी कल्याणकारी राजा अशी एक नाही हजारो बिरुदे ज्याला लावता येतील असा बहुजणांचा नायक छत्रपती शिवाजी महाराज हे एकमेव राजा होता. म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र आणि चारित्र्य समोर येण्यासाठी गीतेच्या पारायणाऐवजी गावागावात शिवचरित्राची पारायणं लावणे गरजेचे आहे. शिवरायांच्या विचारांचा, आचरणांचा, शिवनीतीचा आणि शिवशाहीचा अंगीकार करणे गरजेचे आहे. हे सर्व गुण अंगीकारले तर देशभरातल्या जातीय दंगली बंद होऊन शांतता प्रस्थापित होईल, राष्ट्रांचे महान राष्ट्र होतील, मानवांचे महामानव होतील, शत्रुंचे मित्र होतील, दुराचारांचे सुविचार होतील, असुरांचे देव होतील आणि हे विश्वाचि माझे घर या स्वप्नांची पूर्ती होईल. त्यावेळी हे बहुजननायक छत्रपती शिवाजी महाराज आपल्याला खऱ्या अर्थाने समजले असे मानता येईल. आणि आपली शिवचरणी असणारी मानवंदना खरी ठरेल असा मला विश्वास आहे...!




**बापुराव भास्कर वऱ्हाडे**

मो.नं. ८४८४०८८५८४/ ९६७३८६४८८७